# कार्यालय, नागपूर महानगरपालिका नागपूर
## (शिक्षण विभाग)

जा. क्र.....शि.वि. 2040 दि.30/06/2014

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व उच्च प्राथमिक / माध्यमिक शाळा,
मनपा नागपूर.

**विषयः—इयत्ता 6 ते 8 करिता स्वाध्यायपुस्तिका उचल करण्याबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक सत्र 2014–15 करीता सर्व शिक्षा अभियान अंतर्गत इयत्ता 6 वी ते 8 वी करीता मराठी, हिन्दी, उर्दू माध्यमाच्या स्वाध्यायपुस्तिका उपलब्ध झालेले असून त्याचे वाटप खालील तक्त्यात दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार संबंधित झोन चे शाळनिरिक्षक, केंद्रसमन्वयक यांच्या मार्फत निर्देशित समुह साधन केंद्रावर करण्यात येत आहे.

परिपत्रकात दिलेल्या तारखेनुसार निर्देशित समुह साधन केंद्रावरुन स्वाध्यायपुस्तिकेची उचल करावी. येतांना मुख्याध्यापकांचा शिक्का व स्वाध्यायपुस्तिका शाळेत सुरक्षित नेण्याकरीता आवश्यक साहित्य सोबत आणावे. स्वाध्यायपुस्तिका विद्यार्थ्यांना वितरीत करण्यापूर्वी याअगोदर पाठयपुस्तक उचल करण्याबाबत कार्यालयाद्वारे पाठविण्यात आलेल्या परिपत्रकातील सुचनाचे पालन करावे. पुस्तकांचे उचल किंवा वाटपात दिरंगाई झाल्यास संबंधित शाळेचे मुख्याध्यापक जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

**टिप :— शैक्षणिक सत्र 2014—15 करीता पाठयपुस्तकांच्या वाटपाच्या वेळेस प्रत्येक शाळेला पाठयपुस्तक वाटपाबाबत 'शाळाप्रत' देण्यात आलेली आहे. ती शाळा प्रत स्वाध्यायपुस्तिकांचे उचल करतेवेळेस सोबत आणावी ज्यामुळे अप्राप्त पाठयपुस्तके संबंधित शाळांना देणे सोयीस्कर होईल.**

स्वाध्यायपुस्तिका वाटपाचे वेळापत्रक

| दिनांक/वार | झोन | वाटपाची वेळ | माध्यम | केंद्र |
|---|---|---|---|---|
| 2/07/2014 बुधवार | 1 ते 5<br>6 ते 10 | सकाळी 10 ते 12<br>दुपारी 12 ते 2 | मराठी माध्यमच्या सर्व माध्यमिक शाळा | दुर्गानगर समुह साधन केंद्र |
| 3/07/2014 गुरुवार | 1 ते 5<br>6 ते 10 | सकाळी 10 ते 12<br>दुपारी 12 ते 2 | मराठी माध्यमच्या सर्व उच्च प्राथ शाळा | दुर्गानगर समुह साधन केंद्र |
| 2/07/2014 बुधवार | 1 ते 5<br>6 ते 10 | सकाळी 10 ते 12<br>दुपारी 12 ते 2 | हिन्दी माध्यमच्या सर्व माध्यमिक शाळा | जूना बगडगंज समुह साधन केंद्र |
| 3/07/2014 गुरुवार | 1 ते 5<br>6 ते 10 | सकाळी 10 ते 12<br>दुपारी 12 ते 2 | हिन्दी माध्यमच्या सर्व उच्च प्राथ. शाळा | जूना बगडगंज समुह साधन केंद्र |
| 2/07/2014 बुधवार | 1 ते 5<br>6 ते 10 | सकाळी 10 ते 12<br>दुपारी 12 ते 2 | उर्दू माध्यमच्या सर्व माध्यमिक शाळा | बाळाभाऊपेठ समुह साधन केंद्र |
| 3/07/2014 गुरुवार | 1 ते 10 | सकाळी 10 ते 2 | उर्दू माध्यमच्या सर्व उच्च प्राथ शाळा | बाळाभाऊपेठ समुह साधन केंद्र |

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

प्रतिलीपी माहितीस्तव सादर.

1. मा. आयुक्त म.नपा. नागपूर
2. मा. अपर आयुक्त म.न.पा नागपूर
3. मा. उपायुक्त म.न.पा नागपूर
4. शाळा निरिक्षक झोन क्र. 1 ते 10 म.न.पा. नागपूर.
5. केंद्र समन्वयक, झोन क्र. 1 ते 10 म.न.पा. नागपूर.